# प्रेसनोट दि. २३.०१.२०१९

कवठेमहंकाळ पेलीस ठाणे येथील श्री.प्रमोद मारूती रोडे पोलीस कॉन्स्टेबल ब.नं १९९७ व श्री. सुनिल मल्हारी घोडके पोलीस कॉन्स्टेबल ब. नं २४४१ मधील यांना १५०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे वाळू वाहतूकीच्या ट्रकवर कारवाई न करण्याकरीता कवठेमहंकाळ पोलीस ठाणेमधील रोडे पोलीस यांनी २००००/- रूपयाची लाच मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी दि.२३.०१.२०१९ रोजी तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक २३.०१.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये राडे पोलीस व घोडके पोलीस कवठेमहंकाळ पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचे वाळू वाहतूकीच्या ट्रकवर कारवाई न करण्याकरीता प्रथम २००००/- व चर्चेअंती १५०००/- रूपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.२३.०१.२०१९ रोजी नागज फाटा येथील हॉटेल शिवकृपा येथे सापळा लावला असता त्यावेळी श्री. प्रमोद मारूती रोडे पोलीस कॉन्स्टेबल ब.नं १९९७ वय ३२ वर्ष व श्री. सुनिल मल्हारी घोडके पोलीस कॉन्स्टेबल ब. नं २४४१ वय २९ वर्ष कवठेमहंकाळ पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे १५०००/- रूपये लाचेची मागणी करून १५०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून त्यांचे विरुध्द कवठेमहंकाळ पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. संदीप दिवाण सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री. राजकुमार गायकवाड सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेंद्र साळुंखे पोलीस उप अधीक्षक व पोलीस कर्मचारी, जितेंद्र काळे, भास्कर भोरे, संजय कलकुटगी, अविनाश सागर, संजय संकपाळ, रविंद्र धुमाळ, श्रीपती देशपांडे, बाळासाहेब पवार, स्वाती माने यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(राजेंद्र साळुंखे)
पोलीस उप-अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली